**फौ. कि. चौ. अर्ज क्र.९०/२०२१**

**सौ.माधुरी वि. समीर +०३**

**CNR No. MHRG090003802021**

**<u>अर्ज नि.क्र.०५ खाली आदेश</u>**

०१. अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज कौटूंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ ('कौटूंबिक हिंसाचा अधिनियम' संक्षीप्त स्वरूपात) कलम २३ अन्वये उत्तरवादी क्र.०१ व ०३ यांचेकडून प्रती महिना रू.२५,०००/– आर्थिक अनुतोष देण्याचे आदेश मिळण्याची विनंती केली.

०२. अर्जदाराने दाखल केलेला अर्ज व उत्तरवादी क्र.०१, उत्तरवादी क्र.०२ व ०३ आणि उत्तरवादी क्र.०४ यांनी सदर अर्जावर त्यांचे दिलेले म्हणणे अनुक्रमे (नि.क्र.२६अ, २६ व २७) वाचले. अर्जदार व उत्तरवादी क्र.०१ ते ०४ यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०३. अर्जदार व उत्तरवादी यांचे कथनाकडे वळण्यापूर्वी कौटूंबिक हिंसाचार अधिनियम मधील कलम २३ चे अवलोकन करणे न्यायोचीत ठरेल. सदरील कलमाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता उत्तरवादी याने कौटूंबिक हिंसाचाराचे कृत्य केले आहे किंवा ते तो कृत्य करीत आहे किंवा सदरील स्वरूपाचे कृत्य घडणे त्याचेकडून संभाव्य आहे अशी न्यायालयाची अर्जदाराने केलेल्या अर्जावरून सकृतदर्शनी खात्री झाली असता न्यायालय कौटूंबिक हिंसाचार अधिनियम खाली नमूद कलम १८ ते २२ मधील मागण्यांचे अनुशंगाने अंतरीम किंवा एकतर्फी आदेश पारीत करू शकत असल्याचे स्पष्ट होते.

०४. अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज शपथेवर दाखल केला. अर्जातील कथन उत्तरवादी क्र.०१ ते ०४ यांनी अर्जदाराला शारिरीक व मानसिक प्रकारचा त्रास देवून तिचेवर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दर्शवितो. अर्जदाराचे कथन उत्तरवादी क्र.०१ हा तिला मादरचोत,

आयझवाडे अशी अश्लिल शिवीगाळ करून तू माझेशी लग्न का केले असे म्हणायचा. उत्तरवादी क्र.०२ हा अर्जदारास 'भोसडी तुझ्यामुळेच माझा मुलगा आजारी झाला आहे, पंताला लागला आहे, काही कामधंदा करत नाही, नुसती झोपा काढते,' असे म्हणायची. उत्तरवादी क्र.०३ 'तू माझे मुलाला स्पर्षही करायचा नाही, तुला राहायचे असेल तर राहा नाहीतर जा, तुला घटस्फोट हवा असेल तर देवू शकतो,' असे म्हणायचा. लग्नानंतर उत्तरवादी यांनी अर्जदाराचा मोलकरीण म्हणून वापर केला. त्यांनी तिचेकडे दुर्लक्ष केले. त्यांनी अर्जदारास सासरचे घर सोडून जाण्याकरीता प्रौवृत्त केले. त्यांनी तिला शिक्षण पुर्ण करण्यास पैसे दिले नाही, मदत केली नाही. उत्तरवादी क्र.०३ व ०४ यांनी अर्जदाराचे आईकडे उत्तरवादी क्र.०१ चे आजारपणा करीता दहा लाख रुपयांची मागणी केली. ती मागणी पुर्ण न झाल्यामुळे त्यांनी तिचा मानसिक छळ केला. उत्तरवादी क्र.०१ याने अर्जदाराला पत्नीचा दर्जा दिला नाही, त्याने तिला शारिरीक सुखापासून वंचीत ठेवले. उत्तरवादी यांनी अर्जदाराला उत्तरवादी क्र.०१ यास दारूचे व्यसन, किडणीचा आजार, या बाबी तिला न सांगता तिचेपासून लपवून ठेवल्या. परिणामी, अर्जदाराने प्रस्तूतचे अर्जाद्वारे परि.क्र.०१ मधील नमूद मागणी उत्तरवादी क्र.०१ व ०३ यांना पूर्ण करण्याचे अनुशंगाने आदेश देण्याची विनंती केली.

०५. याउलट उत्तरवादी क्र.०१ चे कथन असे दर्शविते की, अर्जदार लग्नाचे एका महिन्यानंतर वेगळे राहण्याची मागणी करू लागली. ती क्षुल्लक कारणावरून भांडण करायची, तिला मुंबईत राहणारा व नोकरी करणारा नवरा हवा होता, असे त्याला म्हणायची. ती तिचे सासूला टोमणे मारायची, ती सारखी माहेरी जाण्याची मागणी करायची. अर्जदाराचे रागीट, हट्टी स्वभावाचा उत्तरवादी क्र.०१ चे आरोग्यावर विपरीत परिणाम झाला. शेवटी त्याचे किडणी ट्रान्सप्लान्टचे ऑपरेशन करावे लागले. त्या दरम्यान अर्जदाराने उत्तरवादी क्र.०१ चे आरोग्याची कोणतीही काळजी घेतली नाही. उत्तरवादी क्र.०३ यांनी तिला फोन केला असता मला तुमचे

मुलासोबत संसार करायचा नसून मी कायमस्वरूपी माहेरी निघाल्याचे तिने त्यांना सांगितले. अर्जदार ही उच्च शिक्षीत असून खाजगी नोकरी करते. तिने उत्तरवादी यांना तिचे वागणूकीद्वारे शारिरीक व मानसिक त्रास दिला. उत्तरवादी क्र.०२ व ०३ आणि उत्तरवादी क्र.०४ यांनी त्यांचे म्हणणे अनुक्रमे (नि.क्र.२६ व २७) द्वारे उत्तरवादी क्र.०१ चे कथनाची बऱ्याचअंशी उजळणी केली. सर्व उत्तरवादी यांनी अर्जदाराने त्यांचेविरूद्ध केलेले कौटूंबीक हिंसाचाराचे आरोप फेटाळले. शेवटी त्यांनी प्रस्तूत अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०६. उल्लेखनीय बाब म्हणजे उत्तरवादी क्र.०१ ते ०४ यांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल केले. परंतू, त्यांनी त्यांचे म्हणण्याचे पुष्ट्यर्थ शपथपत्र अभिलेखावर दाखल केले नाही. त्याचप्रमाणे त्या अनुशंगाने कोणतेही स्पष्टीकरण अभिलेख दर्शवित नाही. नमूद परिस्थितीमध्ये उत्तरवादी यांनी त्यांचे कथनामध्ये घेतलेला बचाव विचारात घेता येणार नाही.

०७. पुढे जाण्यापूर्वी अर्जदार व उत्तरवादी यांना मान्य असलेल्या बाबी विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. अभिलेखाची काळजीपूर्वक पहाणी केली असता अर्जदार व उत्तरवादी यांचेमध्ये नातेसंबंध दोन्ही पक्षांना मान्य असल्याचे दिसून पडते.

०८. अर्जदार व उत्तरवादी यांनी त्यांची कथने शपथेवर अभिलेखावर दाखल केली. नमूद परिस्थितीमध्ये कोणता पक्ष सत्य बोलत आहे?, हे ठरविणे काही अंशी कठिण आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे संरक्षण अधिकारी यांनी कौटूंबिक हिंसाचार घटनांचे अनुशंगाने अहवाल दाखल केल्याचे दिसून पडते. सदरील अहवालाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता त्यांनी उत्तरवादी यांचेकडून अर्जदार हिला शिवीगाळ, पैशाची मागणी, सासरचे घर सोडून जाण्याकरीता प्रोत्साहान, तिचा मोलकरीण म्हणून वापर, उत्तरवादी क्र.०१ ला असलेला किडणीचा आजार व दारूचे व्यसन या बाबी लपविल्याचे दिसून पडते.

०९. सामान्य परिस्थितीमध्ये कुठलिही भारतीय स्त्री तिचे सासरचे व्यक्तींकडून तिला

चांगल्या प्रकारची वागणूक मिळत असल्यास त्यांचेविरूद्ध खोटे दोषारोप करण्याचा पर्याय निवडणार नाही. त्याचप्रमाणे कुठलिही स्त्री तिचे सासरच्यांनी तिला आदराची वागणूक न देवून तिचे पतीचे स्वास्थ्य व व्यसनासंबंधी तिला माहिती न दिली गेल्यास तिची फसवणूक झाल्याचे तिला वाटेल. नमूद परिस्थितीमध्ये अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे दिसून पडते.

१०. अर्जदाराचे कथनाप्रमाणे उत्तरवादी क्र.०१ व्यवसायीक असून उत्तरवादी क्र.०३ हा तहसिलदार आहे. त्यांना दरमहा दहा लाख पन्नास हजार आर्थिक उत्पन्न मिळते. तिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिचे शिक्षण बीएससी पदवीधर झालेले आहे. परंतू, अर्जदाराने उत्तरवदी यांचे उत्पन्नासंबंधी कुठलाही लेखी पुरावा दिला नाही. महत्वाची बाब म्हणजे अर्जदाराला आर्थिक अनुतोष मंजूर करतेवेळी तिचे शिक्षण बीएससी पदवीधर झालेले असून ती शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याचे बाब विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. उत्तरवादी यांचे कथनाप्रमाणे अर्जदार ही खाजगी नोकरी करते. परंतू, त्यांनी देखील त्या अनुशंगाने पुरावा दाखल केला नाही. उत्तरवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता उत्तरवादी क्र.०१ याचे किडणी ट्रान्सप्लान्टचे ऑपरेशन झाल्याचे दिसून पडते. परंतू, सध्या उत्तरवादी क्र.०१ हा कुठल्याही प्रकारे कामकाज करण्यास सक्षम नाही, असे दर्शविणारा पुरावा उत्तरवादी यांनी अभिलेखावर दाखल केला नाही.

११. कौटूंबीक हिंसाचार अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे उत्तरवादी क्र.०१ याची अर्जदारास सांभाळण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे अर्जदार व उत्तरवादी क्र.०१ ते ०४ यांचेमधील कौटूंबिक नातेसंबंधांचे अनुशंगाने वाद असल्याचे दिसून येत नाही. नमूद परिस्थितीमध्ये अर्जदार व उत्तरवादी क्र.०१ यांचे राहणीमानाचा दर्जा, उत्तरवादी क्र.०१ याला सामान्य परिस्थितीमध्ये काम केल्यास मिळणारे उत्पन्न, त्याचेवर असलेल्या जबाबदाऱ्याचे अनुशंगाने पुराव्याचा अभाव व अर्जदाराचे बीएससी पदवीधर शिक्षण तसेच ती शारिरीकदृष्ट्या

सक्षम असल्याची बाब, या बाबी विचारात घेता माझे मते अर्जदारास प्रती महिना रू.१,५००/– रक्कम आर्थिक अनुतोष म्हणून उत्तरवादी क्र.०१ याला देण्यास आदेशीत करणे न्यायोचीत ठरेल. अर्जदार व उत्तरवादी क्र.०३ यांचे नाते विचारात घेता त्यांचेकडून अर्जदारास आर्थिक अनुतोष देण्याचे आदेश करणे न्यायोचीत ठरणार नसल्याचे दिसून पडते. वरील विवेचनाअंती मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. उत्तरवादी क्र.०१ याने अर्जदारास कौटूंबीक हिंसाचार अधिनियम कलम २० प्रमाणे रू.१,५००/–(रुपये एक हजार पाचशे मात्र) प्रति महिना प्रस्तूत अर्ज दाखल केला तेव्हा पासून म्हणजेच दि.०८/०६/२०२१ पासून प्रस्तूत प्रकरणाचा न्यायनिर्णय होईपर्यंत द्रव्याच्या स्वरुपात अनुतोष द्यावा.

०३. आदेशाची प्रत अर्जदार व उत्तरवादी यांना मोफत देण्यात यावी.

०४. आदेशाची प्रत पोलीस स्टेशन, रोहा व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. त्यांनी प्रस्तूत आदेशाचे अंमलबजावणीमध्ये अर्जदारास मदत करावी.

sunil sakharam mahale

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.08.17 18:00:03 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दिनांकः १७.०८.२०२३ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | :- S.G.Padwal, Grade -III. |
| Name of the Court | :- C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- 17/08/2023. |
| Judgment / Order delivered on | :- 17/08/2023. |
| Judgment / Order signed on | :- 17/08/2023. |
| Judgment / Order uploaded on | :- 17/08/2023. |